# नवी मुंबई महानगरपालिका

## सन २००७-०८ च्या सुधारीत आणि सन २००८-०९ च्या अर्थसंकल्प "अ" आणि "क" यावरील स्थायी समिती, सभापती यांचे निवेदन.

दिनांक १९ मार्च २००८.

सन्मा. महापौर, सन्मा. उपमहापौर, सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. आयुक्त आणि सर्व उपस्थित पत्रकार. . . . . .

आयुक्तांनी सन २००७-०८ चे सुधारीत आणि सन २००८-०९ करीता अर्थसंकल्प "अ" आणि "क" च्या महसुली आणि भांडवली जमा आणि खर्चाचे अंदाज स्थायी समितीच्या दि. १३ फेब्रुवारी २००८ रोजी भरलेल्या सभेमध्ये सादर केले होते. त्याचप्रमाणे परिवहन उपक्रमाचा सन २००७-०८ चा सुधारीत आणि सन २००८-०९ चा अर्थसंकल्प "ब" आणि शिक्षण मंडळाचा तसेच वृक्ष प्राधिकरणाचा सन २००७-०८ चा सुधारीत आणि सन २००८-०९ चा अर्थसंकल्प स्थायी समितीच्या अर्थसंकल्पविषयक विशेष सभेपुढे सादर करण्यात आले. सन २००७-०८ चा सुधारीत आणि सन २००८-०९ चा अर्थसंकल्प "अ" आणि "क", परिवहन उपक्रमाचा अर्थसंकल्प "ब" आणि शिक्षण मंडळाच्या तसेच वृक्ष प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पावर विचार करण्यासाठी दिनांक २१, २५, आणि २६ फेब्रुवारी २००८ तसेच दिनांक ३, ४, ५, ११ आणि १२ मार्च २००८ रोजी स्थायी समितीच्या अर्थसंकल्पविषयक विशेष सभा घेण्यात आल्या.

### सन २००७-०८ चा सुधारीत अर्थसंकल्प 'अ'आणि 'क':

आयुक्तांनी सन २००७-०८ चा सुधारीत अर्थसंकल्प 'अ'आणि 'क' सादर करतांना आरंभीची शिल्लक रुपये १२८ कोटी ८० लाख २० हजार जमेस धरुन, सुधारीत महसुली आणि भांडवली एकुण उत्पन्न रुपये ६९१ कोटी २९ लाख २० हजार तर सन २००७-०८ करीता सुधारीत महसुली आणि भांडवली खर्च रुपये ६०७ कोटी ९० लाख ६ हजार इतका प्रस्तावित केला असून दि.३१

मार्च २००८ अखेर रुपये ८३ कोटी ३९ लाख १४ हजार इतकी शिल्लक राहील, असे नमूद केले आहे.

ठाणे जिल्ह्याचे मा. पालकमंत्री ना.गणेशजी नाईक साहेब यांनी निवडणुकीपुर्वी नवी मुंबईच्या तमाम जनतेला असे अभिवचन दिले होते की, आगामी ५ वर्षाच्या कालावधीमध्ये महानगरपालिकेच्या कोणत्याही करामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ केली जाणार नाही. त्यानुसार कोणतीही कर / दरवाढ नसलेला अर्थसंकल्प तयार करण्याचा मनोदय होता. यासाठी, उपकरात कोणत्याही प्रारची वाढ न सुचवता चालू आर्थिक वर्षाचेच दर आगामी वर्षासाठी मंजूर करण्यात आले आहेत, हे सांगताना मला आनंद होतोय.

नागरिकांना उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा पुरविण्याची बांधिलकी लक्षात घेऊन संपुर्ण महापालिका क्षेत्रात विविध सुविधा कामे गतिमानतेने सुरु आहेत. याशिवाय मा.पालकमंत्री महोदयांचा शहरांच्या प्रगतिबाबबतचा दूरदृष्टीकोन लक्षात ठेवून नवी मुंबईच्या विकासाला गती देण्यासाठी नव्याने कोणते प्रकल्प हाती घ्यावयाचे आहेत, कोणती नागरी सुविधा कामे हाती घ्यावयाची आहेत आणि शहराच्या विकासाची नेमकी दिशा कशी असेल याला मूर्त स्वरुप देण्याची जबाबदारी स्थायी समिती, सभापती म्हणून माझ्यावर असल्यामुळे त्या दृष्टीने हा अर्थसंकल्प तयार करण्याचा संकल्प केला आहे. नवी मुंबई हे २१ व्या शतकातील आधुनिक शहर आहे असे जरी आपण म्हणत असलो तरी नवी मुंबईला आंतरराष्ट्रीय शहराचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी आणि त्याच दर्जाच्या सोयी सुविधा नवी मुंबईला सुध्दा उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी काही महत्वकांक्षी प्रकल्प हाती घेऊन ते पुर्णत्वास नेण्यासाठी सर्वच कामांना नवी दिशा देण्याची गरज आहे.

यापुर्वी नवी मुंबई महानगरपालिकेला कोणत्याही कामासाठी कर्ज घेण्याची गरज पडली नव्हती. परंतु, शहराला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करुन द्यावयाचा असेल तर कर्जाचा विचार करणे चुकीचे ठरणार नाही. महानगरपालिकेचे नियमित उत्पन्न हे नियमित कामासाठी पुरेसे आहे. मात्र वर उल्लेख केल्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर निर्माण करण्यासाठी काही दीर्घ मुदतीचे प्रकल्प हाती घेणे गरजेचे आहे. शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, मुलभूत सोयीसुविधा, आरोग्य, शैक्षणिक आणि सांस्कृतीक व्यासपीठ, वायुप्रदूषण, पर्यटन, करमणूक केंद्रे यासारख्या अत्याधुनिक सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची गरज भासणार आहे. आणि आपणाला माहित आहे की, जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान

(J.N.N.R.U.M.) प्रकल्पांतर्गत केंद्र सरकारकडून आपणांस मोठ्या प्रमाणावर अनुदान मिळणार आहे. आयुक्तांनी सादर केलेल्या प्रकल्पासंबंधातील अर्थसंकल्पामध्ये त्याप्रमाणे तपशील दिलेले आहेत. तथापि, मोठमोठे प्रकल्प राबविण्यासाठी चढ्या दराने कर्ज घेण्याची आवश्यकता नाही. आंतरराष्ट्रीय मंदीमुळे परदेशी बँका अत्यल्प दराने वित्तपुरवठा करण्यासाठी पुढे आल्या आहेत, हेही नजरेआड करता येणार नाही. आपल्या प्रकल्पांसाठी अत्यल्प दरात कर्ज / अर्थसहाय्य उपलब्ध करुन घेण्यासाठी विदेशी संस्था/ बँका यांच्याकडे महानगरपालिका प्रशासनाने विचारणा करावी, असे मी सुचवू इच्छितो. जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान (J.N.N.R.U.M.) प्रकल्प आणि बी.एस. यु.पी. अंतर्गत प्रस्तावित करण्यांत आलेल्या प्रकल्पाखेरीज ॲम्युझमेंट पार्क, इलेव्हेटर फुट ब्रीज, मल्टीमिडिया लायब्ररी, मेट्रो रेल्वे आणि सिटीझन कार्ड या सारखे महत्वकांक्षी प्रकल्प राबविण्याचीसुध्दा गरज आहे. असे प्रकल्प राबविण्यासाठी महानगरपालिकेला फार मोठया प्रमाणावर निधी उभारण्याची आवश्यकता नाही. केवळ अशा प्रकल्पाची माहिती असलेल्या संस्थांना यामध्ये सहभागी करुन घेण्याची गरज आहे. अशा संस्था संपूर्ण प्रकल्प खर्च करण्यास तयार असतात. त्यासाठी केवळ प्रशासकीय दूरदृष्टीकोनाची गरज आहे. त्या दृष्टीने प्रशासनाने सकारात्मक पुढाकार घ्यावा. वरीलप्रमाणे जर आपण नवी मुंबईमध्ये राहणाऱ्या नागरिकांना सुविधा उपलब्ध करुन देऊ शकलो तर नवी मुंबईला सुध्दा आंतरराष्ट्रीय शहराचा दर्जा प्राप्त होऊ शकेल.

अर्थसंकल्पामध्ये उत्पन्नाच्या दृष्टीने महत्वाचे समजले जाणारे तीनच विभाग आहेत. त्यामध्ये उपकर, मालमत्ता कर आणि नगररचना या विभागांचा समावेश होतो. सन २००७-०८ करिता मालमत्ता करापोटी एकूण रुपये १२८ कोटी २६ लाख ५७ हजार इतके उत्पन्नाचे उद्दीष्ट ठरवून दिले होते. मालमत्ता कराच्या वसुलीसाठी आयुक्तांनी संबंधित विभागाला विविध उपाययोजना सुचविल्या होत्या. मालमत्ता धारकांच्या मागे लागून त्यांना कर भरण्यांस प्रवृत केल्यामुळे दि. ३१ मार्च २००८ पर्यंत रुपये १४२ कोटी ५८ लाख ७६ हजार इतके उत्पन्न प्रस्तावित केले आहे. मालमत्ता कराप्रमाणे उपकराच्या बाबतीत देखील सन २००७-०८ चे उद्दीष्ट रुपये १९५ कोटी २ लाख इतके नेमून दिले असतांना दिनांक ३१ मार्च २००८ पर्यंत रुपये २०९ कोटी २ लाख इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पामध्ये ज्या लेखाशीर्षकामध्ये स्थायी समितीने रुपये ११८ कोटी ९२ लाख ७ हजार इतकी वाढ प्रस्तावीत केली आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

(आकडे रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशिल | आयुक्तांचे अंदाज | स्थायी समितीचे अंदाज | निव्वळ वाढ |
|---|---|---|---|---|
| १. | उपकर Cess | २२५०२.५४ | २८५००.०० | ५९९७.४६ |
| २. | मालमत्ता कर Property Tax | १६१३१.६४ | २००००.०० | ३८६८.३६ |
| ३. | नगररचना Town Planning | ५६००.०० | ६०००.०० | ४००.०० |
| ४. | गटारे, रस्ते खुदाई बाबत शुल्क Road, Gutter Cutting Charges | ७००.०० | १०००.०० | ३००.०० |
| ५. | अनधिकृत बांधकामे शुल्क/दंड Unauthorised Construction Fees / Penalty | २२५.०० | ४००.०० | १७५.०० |
| ६. | जाहिरात शुल्क Advertising Fees | २०५.५० | ३५०.०० | १४४.५. |
| ७. | हॉटेल परवाना शुल्क Hotel License Fees | १०.०० | १५.०० | ५.०० |
| ८. | मटन विक्री परवाना Mutton Shop License. | ३.२५ | ५.०० | १.७५ |
| ९. | मोरबे धरण पाणी विक्री Morbe Dam Water Sale. | २२००.०० | २८००.०० | ६००.०० |
| १०. | एस.टी.पी. सांडपाणी विक्री STP Raw Sewerage Water Sale. | ५००.०० | ९००.०० | ४००.०० |
| | एकूण | ४८०७७.९३ | ५९९७०.०० | ११८९२.०७ |

त्याचप्रमाणे खालील नवीन लेखाशिर्षक निर्माण करुन त्यापोटी रुपये ३ कोटी २० लाख इतके उत्पन्न अपेक्षित आहे :-

(आकडे रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशिल | स्थायी समितीचे अंदाज |
|---|---|---|
| १. | कार्बन क्रेडिट Carbon Credit | १००.०० |
| २. | शॉपिंग मॉल वरील विशेष शुल्क Special Tax | २००.०० |

| | | |
|---|---|---|
| | on Shopping Mall | |
| ३. | तलाव बोटिंग भाडे/ शुल्क | १०.०० |
| ४. | मोरबे धरण पार्क | १०.०० |
| | एकूण | ३२०.०० |

## कार्बन क्रेडीट :-

महोदया, उत्पन्नाच्या बाजूकडे वरीलप्रमाणे ४ नवीन लेखाशीर्षक निर्माण करतांना त्यासंबंधातील तपशीलात जाणे क्रमप्राप्त आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने मागील ३-४ वर्षापासून शास्त्रोक्त पध्दतीने घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी २/३ सेल निर्माण केले आहेत. पुर्ण झालेल्या सेलमधून मिथेनसारख्या घातक वायु हवेमध्ये मिसळत असल्यामुळे वायुप्रदुषणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. सदर मिथेन वायुची विल्हेवाट लावून त्या माध्यामातून विकसित देशांकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर निधी मिळण्यासाठी प्रयत्न करणारी नवी मुंबई महानगरपालिका ही देशातील पहिली महापालिका आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. त्यासंबंधातील निविदा इत्यादी प्रक्रिया पुर्ण झाली असल्यामुळे सन २००८-०९ या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये किमान रुपये १ कोटी मिळण्याची पूर्ण खात्री आहे. त्यामुळेच उत्पन्नाच्या बाजुकडे हे लेखाशिर्षक प्रस्तावित करण्यांत आले आहे.

## शॉपिंग मॉल:-

नवी मुंबई मध्ये मोठ्या प्रमाणात शॉपिंग मॉल उभे राहत आहेत, हे आपणांस माहित आहे. मालमत्ता कर आणि उपकर यासारख्या नियमित उत्पन्नाव्यतिरिक्त शॉपिंग मॉलवर राज्य शासन जे विशेष शुल्क आणि करमणूक कर आकारते त्यांतील अंशतः हिस्सा महानगरपालिकेस मिळणे क्रमप्राप्त आहे. कारण शॉपिंग मॉलच्या अनुषंगाने वाहतुक व्यवस्था, पार्किंग व्यवस्था तसेच इतर पायाभुत सुविधांवर मोठ्या प्रमाणावर ताण पडतो. त्यामुळे राज्य शासनाला मिळणाऱ्या विशेष शुल्कामध्ये करमणूक करामध्ये महानगरपालिकेला वाटा मिळणे आवश्यक आहे. यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यांसाठी यथोचित प्रस्ताव तयार करुन राज्य शासनाला विनंती करण्याची गरज आहे. यास्तव, रुपये २ कोटी चा महसूल अपेक्षित धरला आहे.

## मोरबे धरण (पार्क) :-

नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे असलेल्या मोरबे धरणाच्या खाली असलेल्या १०० एकरापेक्षा जास्त मोकळ्या जागेमध्ये मैसूर येथे असलेल्या वृंदावन गार्डन प्रमाणे गार्डन बनविण्याची योजना आहे. त्यासाठी सल्लागार नेमणे व तदनुषंगिक कामे करणे प्रगतीपथावर आहेत. स्थायी समितीमध्ये या विषयावर चर्चा होत असतांना मोरबे धरणाच्या मालकी संबंधी आणि हस्तांतरणाबाबत ज्या वाटाघाटी चालू आहेत खरेतर त्या यापुर्वीच करण्याची गरज होती. त्यासाठी प्रशासनाने नेटाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रशासनाने मोरबे धरण, धरणाशी संलग्न असलेली इतर साधन सामुग्री (पंपींग स्टेशन इ.) लवकरात लवकर ताब्यात घ्यावीत व त्याठिकाणी सुंदर उद्यान तयार करावे त्यापोटी आगामी वर्षात किमान रुपये १० लाख इतके उत्पन्न महापालिकेला मिळेल असे पहावे.

सन २००८-०९ च्या अर्थसंकल्प "अ" आणि "क" मध्ये ज्या लेखाशीर्षकाच्या खर्चाच्या तरतुदीमध्ये वाढ करण्यांत आली आहे त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे :-

(रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशील Particulars | आयुक्तांचे अंदाज | स्थायी समितीचे अंदाज | निव्वळ वाढ |
|---|---|---|---|---|
| १. | रस्ते फुटपाथ गटारे बांधणे | १३२८५.४० | १४४८५.४० | १२००.०० |
| २. | जलवाहिन्या टाकणे/बदलणे (सिडको वसाहती मधील) | २००.०० | १२५०.०० | १०५०.०० |
| ३. | मलनिःस्साण वाहिन्या टाकणे / बदलणे (सिडको वसाहतीमधील) | २००.०० | १२५०.०० | १०५०.०० |
| ४. | मोफत अंत्यविधी (ऐच्छिक) | ०.०० | १००.०० | १००.०० |
| ५. | सार्वजनिक शौचालय देखभाल / दुरुस्ती | १००.०० | ३००.०० | २००.०० |
| ६. | शिक्षण मंडळ अनुदान | १४००.०० | १६००.०० | २००.०० |
| ७. | परिवहन अनुदान | ८५०.०० | १३५०.०० | ५००.०० |
| ८. | शासकीय कर परतावा | २१६५.७७ | ३९६५.७७ | १८००.०० |
| ९. | संक्रमण शिबिर | १.०० | ५१.०० | ५०.०० |
| १०. | ॲम्युझमेंट पार्क | १.०० | १०१.०० | १००.०० |
| ११. | विद्युत तारा भुमीगत करणे | ३५०.०० | ८५०.०० | ५००.०० |
| | एकूण :- | १८५५३.१७ | २५३०३.१७ | ६७५०.०० |

## सिडको वसाहती अंतर्गत जलवाहिन्या आणि मलनिःस्सारण वाहिन्या बदलणे व रस्ते , पदपथ व गटारे बांधणे:-

आपणा सर्वांना माहितच आहे की, सिडको वसाहतीचा मुद्दा नाजुक आणि कळीचा आहे, असे असले तरी त्यातून मार्ग काढणे अत्यंत क्रमप्राप्त आहे. जर महापालिका हद्दीतील इतर सर्व नागरिकांना आपण सोयीसुविधा पुरवितो, मग ते करदाते असोत वा नसोत तर मग सिडको वसाहतीमधील करदात्यांनी काय गुन्हा केला आहे. त्यांच्यापर्यंत सोयी सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे हे विसरुन चालणार नाही. केवळ इमारतींभोवती भिंत आहे म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्षित करणे योग्य नाही. याबाबत सन्मा. स्थायी समिती सदस्यांनी अतिशय तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. सिडको वसाहती सभोवतालची भिंत तोडून वसाहतीमधील रस्ते, पदपथ ताब्यात घ्यावेत. सिडको वसाहतीअंतर्गत २५ ते ३० वर्षापुर्वी टाकण्यांत आलेल्या मलनिःस्सारण वाहिन्या तसेच जलवाहिन्या बदलण्यांत याव्यात आणि वसाहतीमध्ये राहत असलेल्या करदात्यांच्या नरकयातना संपवाव्यात, अशी मी आग्रही भूमिका मांडत आहे. यासाठी अर्थसंकल्पामध्ये रुपये २१ कोटीची भरीव वाढ करण्यांत आली आहे.

## मोफत अंत्यविधी (ऐच्छिक) :-

सदर संकल्पना यापुर्वीदेखील प्रस्तावित करण्यांत आली होती. त्याचा नव्याने पाठपुरावा केल्यास वावगे ठरणार नाही. बरेचदा नागरिकांना शवदहनाचा खर्च परवडणारा नसतो. त्यासाठी सदरचा खर्च पुर्णतः महापालिकेने करावा. त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये नव्याने १ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

## सार्वजनिक शौचालय देखभाल दुरुस्ती :-

महानगरपालिका सार्वजनिक शौचालये बांधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करते, याबाबत दुमत नाही. मात्र, उद्‌घाटन झाल्यानंतर त्याची देखभाल होत नसल्यामुळे अशा शौचालयांची फारच दयनीय अवस्था झाल्याचे निदर्शनांस आले आहे. ज्याप्रमाणे महानगरपालिका विविध ठिकाणी असलेल्या उद्यानांच्या देखभाल दुरुस्तीसाठी कंत्राटदाराची नेमणुक करते. त्याच धर्तीवर

सार्वजनिक शौचालयाच्या देखभालीसाठी विभागनिहाय कंत्राटदाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. कंत्राटामध्ये दैनंदिन साफसफाई, योग्य प्रमाणात पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा इत्यादी कामांचा समावेश असावा. यापुर्वी जी शौचालये दिर्घ मुदतीवर पे ॲन्ड युज या तत्वावर विविध संस्थांना देण्यांत आली आहेत. त्याबाबत जनता समाधानी नाही. शहरी भागातील सार्वजनिक ठिकाणी असलेली शौचालये पे ॲन्ड युज तत्वावर चालविणे योग्य आहे. परंतु, गाव-गावठाण तसेच झोपडपट्टी परिसरामध्ये दाट लोकवस्ती असल्यामुळे अशा ठिकाणी असलेली सार्वजनिक शौचालये पे ॲन्ड युज तत्वावर देण्याचा प्रस्ताव चुकीचा आहे. मी, अशी सूचना करतो की, पे ॲन्ड युज तत्वावर देण्यांत आलेली सार्वजनिक शौचालये संबंधित संस्थाकडून काढून घेण्यांत यावीत. त्यांच्या स्वच्छतेसाठी महानगरपालिकेची स्वतःची यंत्रणा निर्माण करावी. त्या यंत्रणेमार्फत अथवा कंत्राटदारामार्फत नियमित साफसफाई करावी. यासाठी अर्थसंकल्पामध्ये रुपये २ कोटीची वाढ करण्यांत आलेली आहे.

## परिवहन उपक्रमांस अनुदान :-

नागरिकांना प्रवासी वाहतुक सेवा पुरविणे हे महापालिकेचे ऐच्छिक कर्तव्य आहे. या भावनेने परिवहन सेवेच्या दर्जात सुधारणा व्हावी या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमांस डेपो, बस टर्मिनन्स इ. साठी महानगरपालिका हद्दीत किंवा हद्दीबाहेर जागा संपादित करता यावी आणि विकसित करता यावी यासाठी केवळ भांडवली खर्चासाठी म्हणून परिवहन उपक्रमासाठी प्रस्तावित केलेल्या रुपये ८ कोटी ५० लाख इतक्या रक्कमेत रुपये ५ कोटीची वाढ करण्यांत आली आहे.

## संक्रमण शिबिर / ॲम्युझमेंट पार्क :-

नवी मुंबई शहराची भौगोलिक रचना पाहता आपत्कालीन परिस्थितीमध्ये संक्रमण शिबिराची नितांत आवश्यकता आहे. तसेच दैनंदिन धावपळीच्या आजच्या युगात नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी ॲम्युझमेंट पार्कची सुध्दा तितकीच गरज आहे. या प्रकल्पासंदर्भात महानगरपालिकेने नव्याने प्रयत्न करण्याची गरज आहे. हे दोन्ही विषय प्रशासन अडगळीत टाकत असेल तर ते योग्य नाही कारण ती या शहराची गरज आहे. त्यासाठी प्रशासनाने सदर

दोन्ही विषय आपल्या कार्यक्रमपत्रिकेवर घ्यावेत, असे मी सुचवितो. यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यांत आली आहे.

## विद्युत तारा भुमिगत करणे:-

महानगरपालिका हद्दीतील विद्युत तारा भूमिगत करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत पारेषण/वितरण कंपनी (एम.एस.ई.बी.) शी यासंबंधात वाटाघाटी चालू आहेत हे निमित्त करुन येथील जनतेला वेठीस धरणे चुकीचे आहे. शहराच्या ९०% भागात विद्युत तारा भुमिगत आहेत. तथापि, केवळ १० टक्के नागरिकांना त्रास का? याचा विचार होणे गरजेचे आहे. याबाबत महानगरपालिकेने पुढाकार घेऊन ज्या-ज्या ठिकाणी धोकादायक स्थिती आहे अशा ठिकाणी प्राधान्याने हे काम हाती घ्यावे , असे मी सुचवित आहे. यासाठी ५ कोटी रुपयांची वाढ प्रस्तावित केली आहे.

नवी मुंबई शहराचा आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी जे नवीन प्रकल्प प्राधान्याने हाती घ्यावयाचे आहेत, त्यासाठी खालीलप्रमाणे नवीन लेखाशीर्ष निर्माण करण्यांत आले असून त्या-त्या लेखाशीर्षाखाली नमूद केल्याप्रमाणे एकूण ५४ कोटी ६० लाख रुपयांची नव्याने तरतूद करण्यांत आली आहे :-

(रुपये लाखात)

| अ.क्र. | नवीन निर्माण करण्यांत आलेले लेखाशीर्षक | स्थायी समितीने केलेली तरतूद |
|---|---|---|
| १. | बहुउद्देशीय ग्रंथालय Multimedia Library | ५००.०० |
| २. | मत्स्यालय, सायन्स सेंटर, तारांगण, सिटी टॉवर (जागा / बांधकाम) | ४००.०० |
| ३. | स्वयंचलित फुटब्रीज Elevator | ५००.०० |
| ४. | प्रवेशद्वार (वाशी/ऐरोली/शिळफाटा/बेलापुर) City Entrance | ५००.०० |
| ५. | कृत्रिम तलाव (गौरी गणपती विसर्जन) | ५०.०० |
| ६. | इनडोअर गेम स्टेडीयम Indoor Game Stedium | १०००.०० |
| ७. | स्विमिंग पुल (ऑलिंपिक साईज) | १०००.०० |
| ८. | सी.सी.टी.व्ही (रेल्वे स्टेशन/बस टर्मिनन्स/ सार्वजनिक स्थळे) | २५०.०० |
| ९. | दिघा येथील रेल्वे डॅम विकत घेणे. | ५००.०० |
| १०. | सिडको/एम.आय.डी.सी. जागांना कुंपण बांधणे | १००.०० |
| ११. | मेट्रो रेल्वे सर्व्हे | ५०.०० |
| १२. | मॅंग्रोज ट्युरीझम | २०.०० |

| | | |
|---|---|---|
| १३. | सिटीझन कार्ड | १००.०० |
| १४. | गवळी देव पर्यटन स्थळ विकास करणे | २५.०० |
| १५. | J.N.N.R.U.M. Reforms अंमलबजावणी खर्च (लेखा, प्रशासकीय सुधारणा करण्यासाठी संगणक प्रणाली) | १५.०० |

## बहुउद्देशीय ग्रंथालय Multimedia Library :-

सध्याच्या हायटेक आणि आय.टी.च्या युगामध्ये पुस्तके, ग्रंथ इत्यादी छपाई स्वरुपातील साहित्य मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेली ग्रथालये फार थोडीच आहेत. अशी छपाई स्वरुपातील पुस्तके इ. साहित्य संग्रहित करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर जागेची आवश्यकता असते. परंतु, आता आपण संगणकीय युगात वावरत असल्यामुळे आणि संगणकाचा वापर वाढल्यामुळे पेपरलेस संस्कृती वाढत आहे. त्यामुळे लोकांना ई-बुक स्वरुपातील पुस्तके सी.डी./ डी.व्ही.डी./पेन ड्राईव्ह इत्यादी स्वरुपात संग्रहित केल्यास कमी जागेत, कमी खर्चात प्रचंड स्वरुपात साहित्य उपलब्ध होईल. यासाठी बहुउद्देशीय ग्रंथालय Multimedia Library ची निर्मिती करण्यासाठी या अर्थसंकल्पात ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

## मत्स्यालय, सायन्स सेंटर, तारांगण, सिटी टॉवर (जागा / बांधकाम) :-

शहराच्या लौकिकात भर घालणाऱ्या मत्स्यालय, सायन्स सेंटर आणि नेहरु तारांगण यासारख्या सुविधा मुंबईमध्ये उपलब्ध आहेत. तथापि, उपनगरातील नागरिकांना या सुविधांचा लाभ घेता येत नाही. हे लक्षात घेऊन नवी मुंबईत देखील मस्त्यालय, सायन्स सेंटर, तारांगण व सिटी टॉवर असणे गरजेचे आहे. यासाठी सिडकोने याकरिता आरक्षित ठेवलेले भूखंड महानगरपालिकेने सिडकोकडून घेऊन त्यांचे बांधकाम करण्यासाठी या अर्थसंकल्पात नव्याने ४ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

## स्वयंचलित फुटब्रीज Elevator:-

मुंबईमध्ये एम.एम.आर.डी.ए.च्या वतीने महत्वाच्या रेल्वे स्टेशन आणि गजबजलेल्या व्यापारी पेठांमध्ये स्काय वॉक ची योजना आखली आहे. अशीच संकल्पना नवी मुंबई मध्ये राबविण्याची गरज आहे. ठाणे-बेलापुर रस्ता आणि ठाणे-बेलापुर रेल्वे लाईन यामुळे नवी मुंबईची दोन विभागात विभागणी झाली असल्यामुळे रेल्वे स्टेशन आणि रस्त्यावर फुटब्रीज बांधण्याची महत्वकांक्षी

योजना महानगरपालिकेने आखली आहे. केवळ फुटब्रीज बांधून येथील लोकांची सोय होणार नसून अशा ठिकाणी सरकते जीने किंवा स्वयंचलित जीने (Elevator) बसविण्यांत यावेत, यासाठी या अर्थसंकल्पात नव्याने ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

## प्रवेशद्वार (वाशी/ऐरोली/दिघा/शिळफाटा/बेलापुर) City Entrance :-

महानगरपालिका हद्दीत प्रवेश होईल अशा ठिकाणी प्रवेशद्वार असावे ही फार पुर्वीपासूनची मागणी आहे. शहराची ओळख म्हणून प्रवेशद्वाराची आवश्यकता आहेच. अशा प्रवेशद्वाराच्या माध्यमातून नवी मुंबई मध्ये प्रवेश करतांना नवी मुंबई शहरातील सांस्कृतिक ठेवा, ऐतिहासिक वास्तु इ.चे दर्शन झ ााल्यास या शहरातील जडणघडण कशी झाली आहे याची माहिती लोकांना होईल, यासाठी वाशी, ऐरोली, दिघा, शिळफाटा आणि सी.बी.डी. बेलापुर येथे सुरु होणाऱ्या महानगरपालिकेच्या हद्दीच्या ठिकाणी चार प्रवेशद्वार बांधण्यासाठी या अर्थसंकल्पात नव्याने ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

## इनडोअर गेम स्टेडीयम Indoor Game Stedium :-

शहरातील क्रीडा प्रेमींची खेळाची भूक भागविण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने इनडोअर गेम स्टेडीयम बांधता यावे म्हणून भरीव अशी १० कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पामध्ये करण्यांत आली आहे. यामध्ये बेलापुर ते वाशी आणि ऐरोली ते दिघा या परिसरात किमान दोन तरी इनडोअर स्टेडियम बांधता येतील.

## स्विमिंग पुल (ऑलिंपिक साईज) :-

नवी मुंबई महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून नवी मुंबईमध्ये स्विमिंग पुल असावेत अशी मागणी आहे. मात्र त्याला अद्यापही मुर्त स्वरुप आलेले नाही. सिडको स्विमिंग पुलाबाबत दुर्लक्ष करत असली तरी

महानगरपालिकेने आपले कर्तव्य म्हणून स्विमिंग पुल निर्माण करण्यासाठी आपली सर्व कार्यक्षमता लावावी. मला आशा आहे की, महानगरपालिका प्रशासन याकामी पुढाकार घेऊन येथील जनतेला स्विमिंग पुलाची सुविधा उपलब्ध करुन देईल. यासाठी अर्थसंकल्पामध्ये १० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

## सी.सी.टी.व्ही (रेल्वे स्टेशन/बस टर्मिनन्स/ सार्वजनिक स्थळे):-

भारतातील सर्वच मोठ्या शहरांना अतिरेकी कारवाईपासून धोका आहे, हे मान्य करावे लागेल. सुदैवाने त्याची झळ नवी मुंबई परिसराला लागली नाही. परंतु, भविष्यात अशा धोक्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी महानगरपालिकेने स्वखर्चाने रेल्वे स्टेशन, बस टर्मिनन्स, सार्वजनिक ठिकाणी सी.सी.टी.व्ही. ची उभारणी करावी आणि पोलीस खात्याच्या मदतीने नवी मुंबईमध्ये होणाऱ्या संभाव्य घटनांवर चौकस नजर ठेवावी आणि सुरक्षिततेची काळजी घ्यावी, यासाठी अर्थसंकल्पामध्ये २ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

## दिघा येथील रेल्वे डॅम विकत घेणे.:-

असे म्हणतात की, जगामध्ये तिसरे महायुध्द पाण्यासाठी होईल, ही भविष्यवाणी खोटी ठरो अशी मी आशा करतो. मात्र पाण्याची काळजी करणे ही काळाची गरज आहे. दिघा येथे ब्रिटीशकालिन पाणी साठवणुकीचा डॅम आहे. सध्या तो रेल्वेच्या ताब्यात असून त्याचा रेल्वेसाठी काहीही उपयोग नाही. राज्य शासन तसेच रेल्वे मंत्रालय यांचेकडे पाठपुरावा करुन सदर डॅम जर महापालिकेने ताब्यात घेतला तर भविष्यात पाणी टंचाईच्या वेळी त्याचा निश्चितच उपयोग होऊ शकतो. दिघा आणि आजुबाजूच्या परिसरात पाणी पुरवठा एम.आय.डी.सी. च्या बारवी धरणातून होत आहे. म्हणून दिघा येथील रेल्वे डॅम ताब्यात घेतला तर पिण्यासाठी तसेच औद्योगिक वापरासाठी त्या पाण्याचा उपयोग करता येईल. यासाठी अर्थसंकल्पामध्ये ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

## सिडको/ एम.आय.डी.सी. जागांना कुंपण घालणे:-

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सिडको, एम.आय.डी.सी., वन विभाग यांच्या रिकाम्या भूखंडावर अतिक्रमण होऊ नये व त्या जागा नागरी सुविधांसाठी वापरता याव्यात, यादृष्टीकोनातून अशा जागांना सुरक्षित कुंपण घालण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये १ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

## मेट्रो रेल्वे सर्व्हे:-

एम.एम.आर.डी.ए च्या माध्यमातून मेट्रो रेल्वेची योजना कार्यान्वित झाली आहे. नवी मुंबई शहराचा आंतरराष्ट्रीय शहराचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी मेट्रो, मोनो रेल्वे यासारखी आधुनिक सार्वजनिक वाहतुकीची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यासाठी चालू वर्षात शक्य-अशक्यतेची पडताळणी करुन सर्व्हे करण्यासाठी किमान सल्लागाराची नेमणूक करावी म्हणून अर्थसंकल्पात रुपये ५० लाखाची तरतूद करण्यांत आली आहे.

## मॅंग्रोज ट्युरीझम:-

नवी मुंबई शहराला विस्तीर्ण असा खाडी परिसर लाभला आहे. खाडी किनाऱ्यालगत मॅंग्रोज भरपुर प्रमाणांत आहेत. मॅंग्रोजचे महत्व आणि आवश्यकता का आहे. तसेच याठिकाणी फ्लेमिंगो सारखे पक्षी लाखो मैलाचा प्रवास करुन प्रजनन करण्यासाठी येतात, हे देखील लक्षात घेणे गरजेचे आहे. . शाळेमधील मुलांना मॅंग्रोजबाबत माहिती व्हावी तसेच पक्षी प्रेमी पर्यटकांची सोय व्हावी म्हणून महानगरपालिकेने मॅंग्रोज ट्युरिझम ही संकल्पना राबवावी, यासाठी अर्थसंकल्पात रुपये २० लाखाची तरतूद करण्यांत आली आहे.

## सिटीझन कार्ड:-

महापालिका हद्दीतील मालमत्ता धारकांसाठी महानगरपालिकेने विमा योजना राबविण्याचा प्रस्ताव केला आहे, असे समजते. त्याहीपुढे जाऊन मी अशी सुचना करु इच्छितो की, मालमत्ताधारक, त्याचे कुटुंब किंवा भाडेकरु यांची माहिती महापालिकेकडे निश्चितच आहे. या माहितीचाच आधार घेऊन महापालिकेने सिटीझन कार्डची योजना आखली तर ती पुर्णत्वांस नेण्यांस

अडचण येणार नाही. यासाठी अर्थसंकल्पात रुपये १ कोटीची तरतूद करण्यांत आली आहे.

## गवळी देव पर्यटन स्थळ विकास करणे:-

नवी मुंबईतील गवळीदेव परिसर हे एक निसर्गनिर्मित उद्यान आहे. सदर भाग वन विभागाकडे असला तरी हौशी पर्यटक पायी चालत जाऊन तेथील शांत, सुंदर आणि रमणीय अशा निसर्गरम्य परिसरात आनंद लुटत असतात. सदर ठिकाणी येण्या-जाण्यासाठी पाऊलवाट असून महापालिकेने किमान पायऱ्या बांधून रॅलिंगची सुविधा केली तरी पर्यटकांना प्रोत्साहन मिळेल. यासाठी अर्थसंकल्पात रुपये २५ लाखाची तरतूद करण्यांत आली आहे.

स्थायी समितीने सन २००७-०८ चा महसुली आणि भांडवली खर्चाचा सुधारीत अर्थसंकल्प "अ" आणि "क" मंजूर केला असून आरंभीची शिल्लक रुपये १२८ कोटी ८० लाख २० हजार जमेस धरुन सन २००७-०८ करिता एकूण रुपये ६९१ कोटी २९ लाख २० हजार इतका सुधारीत महसुली आणि भांडवली जमा तर सन २००७-०८ चा महसुली आणि भांडवली सुधारीत खर्च एकूण रुपये ६०७ कोटी ९० लाख ६ हजार इतका राहील. सन २००७-०८ अखेर रुपये ८३ कोटी ३९ लाख १४ हजार इतकी शिल्लक राहील.

त्याचप्रमाणे सन २००८-०९ करिता अर्थसंकल्प "अ" आणि "क" करिता आरंभीची शिल्लक रुपये ८३ कोटी ३९ लाख १४ हजार जमेस धरुन एकूण महसुली आणि भांडवली उत्पन्न रुपये १४१९ कोटी १३ लाख ३८ हजार, तर एकूण महसुली आणि भांडवली खर्च रुपये १४१९ कोटी ७ लाख २२ हजार इतका राहील आणि वर्षाअखेर रुपये ६ लाख १६ हजार इतकी रक्कम शिल्लक राहील.

मा. महापौर महोदया, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९६ नुसार स्थायी समितीने सर्वकष विचार करुन तयार केलेला सन २००७-०८ च्या सुधारीत आणि सन २००८-०९ चा अर्थसंकल्प "अ" आणि

"क" उपरोक्त महापालिका अधिनियमाच्या कलम १०० अन्वये मंजुरीसाठी महापालिकेकडे सादर करण्यांत येत आहे.

जय हिंद -जय महाराष्ट्र !

नवी मुंबई

(संदीप गणेश नाईक)

दिनांक १९ मार्च २००८

सभापती, स्थायी समिती

नवी मुंबई महानगरपालिका